'एसआयआर' कार्यक्रमात परभणी राज्यात द्वितीय

लोकसत्ता वार्ताहर

परभणी : विशेष सखोल पुनरिक्षण (एसआयआर) कार्यक्रमात परभणी जिल्ह्याने उल्लेखनीय कामगिरी नोंदविली आहे. या प्रक्रियेतील संगणकीकरणाचे काम जिल्ह्याने १०० टक्के पूर्ण करत मराठवाडा विभागात प्रथम, तर राज्यात एकूण कामगिरीत द्वितीय क्रमांक मिळवला. जिल्ह्यात महानगरपालिका क्षेत्राचा समावेश असतानाही नागरी भागाचा विचार करता परभणी जिल्हा राज्यात प्रथम क्रमांकावर आहे. राज्यातील एकूण क्रमवारीत रत्नागिरी जिल्ह्याने प्रथम क्रमांक मिळविला आहे.

जिल्ह्यातील एसआयआर प्रक्रियेला अपेक्षित गती मिळावी आणि निर्धारित उद्दिष्ट वेळेत साध्य व्हावे, यासाठी जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी रोज सायंकाळी ७ वाजता दूरचित्रसंवादाद्वारे सर्व मतदार नोंदणी अधिकारी यांचा वैयक्तिक आढावा घेतला. तर उपजिल्हा निवडणूक अधिकारी अरुणा संगेवार यांनी प्रशिक्षण, तांत्रिक मार्गदर्शन आणि प्रक्रियेच्या बारकाव्यांबाबत अधिकारी, कर्मचाऱ्यांना आवश्यक ते मार्गदर्शन केले. एसआयआर प्रक्रियेदरम्यान उद्भवणाऱ्या तांत्रिक बाबींचे निराकरण, क्षेत्रीय यंत्रणेशी सातत्यपूर्ण समन्वय आणि कामाच्या प्रगतीचा आढावा घेण्यात त्यांच्या मार्गदर्शनाची महत्त्वपूर्ण भूमिका राहिली. तसेत क्षेत्रीय स्तरावर उपविभागीय अधिकारी तथा मतदार नोंदणी अधिकारी उदयसिंह भोसले (परभणी), शैलेश लाहोटी (सेलू), संगीता चव्हाण (पाथरी) आणि जीवराज डापकर (गंगाखेड) यांनी आपल्या कार्यक्षेत्रात सूक्ष्म नियोजन, नियमित आढावा आणि प्रभावी समन्वयाच्या माध्यमातून एसआयआर कामाला गती दिली. विधानसभा मतदारसंघनिहाय प्रलंबित बाबींवर विशेष लक्ष केंद्रित केले.

> जिल्हा प्रशासन, निवडणूक यंत्रणा, महसूल यंत्रणा, स्थानिक स्वराज्य संस्थांचे कर्मचारी, विविध विभागांचे क्षेत्रीय कर्मचारी आणि हजारो बीएलओ यांच्या एकत्रित प्रयत्नांचे हे फलित आहे.
>
> **- संजयसिंह चव्हाण,** जिल्हाधिकारी

मराठा क्रांती मोर्चाचे आंदोलन

छत्रपती संभाजीनगर : शाश्वत आरक्षणाच्या मागणीसाठी मराठा क्रांती मोर्चाने रविवारी पोलिसांची परवानगी नसतानाही क्रांती चौकात उपोषण सुरू केले. सकाळपासूनच पोलिसांचा मोठा फौजफाटा तैनात असताना ११ वाजता आंदोलकांनी उपोषणाला सुरुवात केली.

पोलिसांनी दुपारी आंदोलकांना ताब्यात घेतल्यानंतर मोर्चाचे ज्येष्ठ आरक्षण अभ्यासक राजेंद्र दाते पाटील यांनी विभागीय आयुक्तालयासमोर बेमुदत उपोषण सुरू केले. शाश्वत आरक्षण मिळेपर्यंत उपोषण सोडणार नसल्याचे त्यांनी सांगितले. पोलिसांनी राजेंद्र दाते पाटील, प्रा. माणिकराव शिंदे, विनोद काकडे पाटील, योगेश शेळके धामोरीकर, सुनील कोटकर, रवींद्र काळे पाटील यांना क्रांती चौकात वाहतुकीस अडथळा निर्माण होणार असल्याने आंदोलनाला परवानगी देता येणार नाही, अशी नोटीस बजावली होती. त्यानंतर डॉ. दाते पाटील यांनी आयुक्ताला समोर उपोषण सुरू केले.

आईचा खून करून मुलाची आत्महत्या

लोकसत्ता वार्ताहर

नांदेड : नांदेडमध्ये तरोडा (खु.) भागातील राहुल कॉलनी येथे एका तरुणाने आईची हत्या करून स्वतः गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली. शनिवारी रात्री आठच्या दरम्यान हा प्रकार घडला. शनिवारी दुपारीच दोन खुनाच्या घटना ताज्या असताना हा प्रकार घडला. या घटनेची नोंद भाग्यनगर पोलीस ठाण्यात नोंद आहे. प्रतीक बालाजी चौथरे (वय २६) व त्याची आई भारती बालाजी चौथरे (वय ५०) अशी मृतांची नावे आहेत.

येथे हे कुटुंबीय वास्तव्यास आहे. घटनेवेळी प्रतीक व त्याची आई भारती हे दोघे घरी होते. प्रतीकने रात्री आई भारती यांच्यावर घरात असलेल्या लोखंडी गजाने व क्रिकेटच्या बॅटने हल्ला चढवला. या हल्ल्यात भारती या गंभीर जखमी झाल्या. त्यानंतर त्यांचा जागीच मृत्यू झाला. आईचा मृत्यू झाल्याचे त्याच्या लक्षात येताच त्याने घरातच गळफास घेतला.

हा प्रकार शेजारील व्यक्तीला समजल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला.

खासदार सुनील तटकरेंच्या निवडीविरोधात तक्रार

लोकसत्ता वार्ताहर

जालना : राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांची झालेली निवड पूर्णपणे बेकायदेशीर आहे. कायदेशीर प्रक्रिया न करता कालावधी पूर्ण होण्याच्या आधीच त्यांनी ही निवड स्वतः करून घेतलेली असून ती रद्द करावी, अशी मागणी परतूर विधानसभा मतदारसंघाचे राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार) अध्यक्ष भाऊसाहेब पाटील गोरे यांनी केंद्रीय निवडणूक आयोगाकडे केली आहे.

तक्रारीत म्हटले आहे की, कोणत्याही पक्षाचा प्रदेशाध्यक्ष त्या पक्षाच्या घटनेनुसार निवडला जातो. राष्ट्रवादी काँग्रेसच्या घटनेनुसार प्रारंभी तालुकाध्यक्ष, त्यानंतर जिल्हाध्यक्ष, विभागीय अध्यक्ष आणि मग या सर्वांच्या समन्वय सभेत राज्याचा प्रदेशाध्यक्ष निवडला जातो. ही निवड प्रक्रिया पूर्तता केल्यानंतर आणि त्या प्रत्येकासाठी घटनेत दिलेला कालावधी पूर्ण झाल्यानंतरच ही निवड जाहीर केली जाते. मात्र, यामधील कोणताही निकष तसेच निवडणुकीसाठी घालून दिलेली प्रक्रिया पूर्ण न करताच स्वतःच कालावधी पूर्ण होण्याच्या आधीच घाईत तटकरे यांनी स्वतःची निवड करून घेतली आहे.

> पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाच्या कालावधीतच ही प्रक्रिया पार पाडणे चुकीचे होते. अशा पद्धतीने स्वतःची निवड करून घेणे राज्यातील कार्यकर्त्यांना रुचलेले नाही. त्यामुळे तटकरे यांची प्रदेशाध्यक्ष म्हणून झालेली निवड रद्द करावी.
>
> **- भाऊसाहेब पाटील गोरे,** अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार)

बीडमध्ये पुन्हा आर्थिक अनियमितता; जिल्हा हिवताप अधिकारी निलंबित

लोकसत्ता वार्ताहर

बीड : जिल्हा परिषदेमधील भविष्य निर्वाह निधीतील गैरव्यवहाराचे प्रकरण ताजे असतानाच आता आणखी एक ८९ लाखांची आर्थिक अनियमीतता उघडकीस आली आहे. याप्रकरणी जिल्हा हिवताप अधिकारी विजयसिंह शिंदे यांना निलंबित करण्यात आले आहे. लातूर येथील आरोग्य उपसंचालक डॉ. रेखा गायकवाड यांनी काढलेल्या आदेशात डॉ. शिंदे यांचे निलंबन काळातील मुख्यालय नागपूर येथील उपसंचालक कार्यालय राहील, असे नमूद करण्यात आले आहे.

या आदेशानुसार, कर्मचाऱ्यांच्या अतिप्रदान देयकातील ८९ लाख ५३ हजार १५८ रुपयांची आर्थिक अनियमीतता उघडकीस आल्याचा आरोप करण्यात आला आहे. ज्या कर्मचाऱ्यांची अतिप्रदान देयके अदा झाली आहेत, त्यांच्याकडून शिंदे यांनी काही आर्थिक लाभ करून घेतला आहे का? याचाही तपास केला जाणार आहे.

छत्रपती संभाजीनगर येथील लेखा व कोषागार कार्यालयाच्या ७ जुलैच्या व नांदेडच्या जिल्हा कोषागार अधिकारी कार्यालयाच्या १५ जुलैच्या पत्रान्वये जुन्या सेवार्थ प्रणालीतून नवीन सेवार्थ प्रणालीत विदा बदल करताना काही आहरण व संवितरण अधिकारी यांच्याकडून चुकीच्या पद्धतीने वेतनाची नोंद केली. सेवार्थ प्रणालीत नोंदवून उपकोषागार कार्यालयात देयके सादर करून वेतन आहरित केल्याचे कळविले आहे.

हे निलंबन आदेश जोपर्यंत अंमलात आहेत तोपर्यंत शिंदे यांना खासगी नोकरी स्वीकारता येणार नाही. अथवा स्वतःला व्यापारी अथवा उद्योगांमध्ये गुंतवून घेता येणार नाही. जर निलंबनाधीन असताना शिंदे यांनी खासगी नोकरी स्वीकारली अथवा स्वतःला व्यापार अथवा उद्योगात अडकवून घेतले तर त्यांनी गैरवर्तन केल्याचे समजण्यात येऊन ते निर्वाहभत्ता मिळण्यास अपात्र ठरतील, असे आदेशात नमूद आहे.

रेशीम बाजारपेठ, प्रशासकीय इमारतीचे बुधवारी लोकार्पण

मुख्यमंत्री फडणवीस यांची उपस्थिती

जालना : जालना शहरातील रेशीम बाजारपेठ आणि प्रशासकीय इमारतीचे उद्घाटन बुधवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांसह इमारतीची पाहणी आणि कार्यक्रमाच्या पूर्वतयारीचा आढावा घेतल्यानंतर आमदार अर्जुन खोतकर यांनी ही माहिती दिली.

आमदार खोतकर म्हणाले, आपण वस्त्रोद्योग राज्यमंत्री असताना राज्यातील पहिली रेशीम बाजारपेठ येथे सुरू करण्याचा निर्णय घेतला होता. त्यासाठी प्रशासनाकडून जागा उपलब्ध करून घेतली आणि इमारत व बाजारपेठेच्या बांधकामासाठी ६ कोटी रुपये मंजूर करून घेत प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली होती. बाजारपेठेची इमारत पूर्ण होऊन आता स्वतःच्या मालकीच्या जागेत रेशीम बाजारपेठ सुरू होणार आहे.

पूर्वी राज्यातील व जालना जिल्ह्यातील रेशीम कोष उत्पादक शेतकऱ्यांना आपला कर्नाटकातील बंगळुरूजवळील रामनगर येथे विक्रीसाठी न्यावा लागत होता. त्यामुळे शेतकऱ्यांचा वेळ, पैसा आणि श्रम खर्च होत असे. ही अडचण लक्षात घेऊन येथेच रेशीम बाजारपेठ सुरू करण्याचा निर्णय दरम्यानच्या काळात जालना कृषी उत्पन्न बाजार समिती परिसराप रेशीम खरेदीची प्रक्रिया सुरू करण्यात आली.

स्थानिक पातळीवर बाजारपेठ उपलब्ध झाल्यामुळे रेशीम उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून त्याचा सकारात्मक परिणाम म्हणून शेतकरी मोठ्या प्रमाणावर रेशीम उत्पादनाकडे वळू लागले आहेत, असे ते म्हणाले.

लोकसत्ता Classifieds

यात्रासहल

दोस्तीटूर : लेहलडाख, हंम्पीबदामी, केरळ, तामिळनाडू, नैनिताल, भूतान, आसाम, नेपाळ, कोलकत्तापुरी सिक्कीम दार्जिलिंगसह, आदिकैलास, चारधाम, नर्मदापरिक्रमा, त्रिस्थळी, कुरवपूर पिठापूर
9429694477/ 9594880123
0070987728-24

महत्त्वपूर्ण निवेदन

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर (ॲडव्हर्टाइजिंग कॉपी) स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची (कन्टेन्ट) पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी, आपल्या वृत्तपत्रांमध्ये अथवा प्रकाशनांमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तींबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान वा हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी द इंडियन एक्स्प्रेस (प्रा.) लिमिटेडला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे वाचकांना आम्ही असा सल्ला देतो की, जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्यांच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी त्यांनी आवश्यक ती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

भारत सरकार
संरक्षण मंत्रालय,
संरक्षण संपदा अधिकारी यांचे कार्यालय,
मुंबई सर्कल, कुलाबा, मुंबई - ४०००० ५.
टेलि नं. : ०२२-२२१५३२३२ (टेलिफॅक्स)
फाईल नं. GEN/NEW/64/Project/XIII /115 दिनांक : ०५.०८.२०२६

ई-लिलाव सूचना

संरक्षण संपदा अधिकारी, मुंबई सर्कल हे आर्टी सेंटर, नाशिक येथील एकल किंवा निवास व्यवस्थेची तरतूद: एएमडब्लूपी प्रकल्पांतर्गत ५६ नं. उभ्या असलेल्या वृक्षांची तोडणीच्या अनुसार गव्हर्नमेंट ई-ऑक्शन सिस्टम वेबसाइट www.eauction.gov.in च्या ऑनलाईन पोर्टलवर ०८.०९.२०२६ रोजी स. १०.०० व दु. ०१.०० दरम्यान ई-लिलावात हजर राहण्याकरिता स्वारस्य असलेल्या बोलीदारांना निमंत्रण देत आहेत. कागदपत्रांचे सादरीकरण/ प्रदान सुरू होणारी तारीख २१.०८.२०२६ स. १०.०० वा. आहे आणि कागदपत्रांचे सादरीकरण/ प्रदान बंद होणारी तारीख २४.०८.२०२६ रोजी सायं. ०५.०० वा. आहे. वृक्षे १८.०८.२०२६ रोजी स. ११.०० वा. दाखविण्यात येणार आहेत. आवश्यक शर्ती व अटी, आवश्यक कागदपत्रांची यादी व ई-लिलाव प्रपत्र, इ. गव्हर्नमेंट ई-ऑक्शन सिस्टम www.eauction.gov.in या वेबसाइटच्या ऑनलाईन पोर्टलवर अपलोड करण्यात येणार आहेत किंवा संरक्षण संपदा अधिकारी, मुंबई सर्कल, कुलाबा मुंबई येथे कार्यालयीन वेळेत पाहता येतील/ प्राप्त करता येतील.

स्वाक्षरी/-
(हर्षा एच.ई., आयडीईएस)
संरक्षण संपदा अधिकारी
मुंबई सर्कल

ReLIANCE Asset Reconstruction

रिफॉर्म एआरसी लिमिटेड
(पूर्वी रिलायन्स ॲसेट रीकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड म्हणून ज्ञात)
दुसरा मजला आयसीसी चेम्बर्स, साकी विहार रोड, एमटीएनएल टेलिफोन एक्सचेंजजवळ, पवई, मुंबई- ४०००७२

ताबा सूचना (पाहा नियम ८(१)) स्थावर मालमत्तेसाठी

ज्याअर्थी रिफॉर्म ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लि. (पूर्वी रिलायन्स ॲसेट रीकन्स्ट्रक्शन कंपनी लि. म्हणून ज्ञात) यांनी १८.१२.२०१९ दिनांकित अभिहस्तांकन करारानुसार रेलिगेअर हाऊसिंग डेव्हलपमेंट फायनान्स कॉर्पोरेशन लि. यांचेकडून वित्तीय मत्ता संपादित केल्या आहेत. रिफार्म ॲसेट रीकन्स्ट्रक्शन कंपनी लि. यांच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी दी सिक्युरिटायजेशन अँण्ड रीकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स अँण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२च्या नियम ३ सोबत वाचावयाच्या कलम १३(२) अंतर्गत देण्यात आलेल्या अधिकारांची अंमलबजावणी करताना १०.०२.२०२० दिनांकित डिमांड नोटीस जारी करून **मंगल जगदीश पेंढारकर व जगदीश गोपीनाथ पेंढारकर, दोघांचेही निवासस्थान ४३/१, भूमापन क्र. १/१/३, मिताली क्लासिक, जी.डी.सावंत कॉलेजजवळ, पाथर्डी फाटा, नाशिक, महाराष्ट्र- ४२२०११, येथेसुद्धा:-- रो हाऊस क्र. १, साईश्री रो हाऊस, भूखंड क्र. २९, भूमापचन क्र. ३२६/१/१/३, सिटी सर्व्हे नं. ७८५९ पैकी, गाव पाथर्डी, तालुका आणि जिल्हा नाशिक, पाथर्डी फाटा, नाशिक, येथेसुद्धा:- एच/०३/१७, आर्ट रबरच्या मागे, एमआयडीसी अम्बड, नाशिक, महाराष्ट्र- ४२२०१० निवासस्थान असलेले,** यांना उक्त सुचनेच्या तारखेपासून साठ (६०) दिवसांत एकूण **रु. २४,९१,५६३.०२ (रुपये चोवीस लाख एक्याण्णव हजार पाचशे त्रेसष्ट आणि पैसे दोन फक्त)**च्या, सूचनेमध्ये नमूद केलेल्या थकित रकमेची परतफेड करण्यात फर्माविले.

आणि कर्जदाराने/हमीदारांनी/गहाणकर्त्यांनी रकमेची परतफेड न केल्यामुळे कर्जदाराला/हमीदारांना/गहाणकर्त्यांना आणि सामान्यतः जनतेला याद्वारे सूचना देण्यात येते की उक्त नियमांच्या नियम ८सोबत वाचावयाच्या उक्त अधिनियमाच्या कलम १३(४) अंतर्गत त्यांना देण्यात आलेल्या अधिकारांची अंमलबजावणी करताना निम्नस्वाक्षरीकारांनी ०६ ऑगस्ट २०२६ रोजी येथील निम्नवर्णित मालमत्तेचा ताबा घेतला आहे.

विशेषतः कर्जदाराला/हमीदारांना/गहाणकर्त्यांना आणि सामान्यतः जनतेला याद्वारे इशारा देण्यात येतो की या मालमत्तेचा खरेदी-विक्री व्यवहार करू नये व मालमत्तेचा असा कोणताही खरेदी-विक्री व्यवहार, दरसाल १३.०० टक्के दराने व्याजासह १२.०९.२०१८ रोजी नुसार **रु. २४,९१,५६३.०२ (रुपये चोवीस लाख एक्याण्णव हजार पाचशे त्रेसष्ट आणि पैसे दोन फक्त)**चा रकमेसाठी दी रिफॉर्म ॲसेट रीकन्स्ट्रक्शन कंपनी लि. यांच्या भारासापेक्ष राहील.

स्थावर मालमत्तेचे वर्णन

गाव पाथर्डी, तालुका आणि जिल्हा नाशिक, पाथर्डी फाटा, नाशिक येथील सिटी सर्व्हे नं. ७८५९ पैकी भूमापन क्र. ३२६/१/१/३, भूखंड क्र. २९वर उभारलेल्या साईश्री रो हाऊसेसमधील तळ मजला+स्टिल्ट मजला+स्टिल्ट पहिला मजला असलेल्या रो हाऊस नं. १चे सर्व हिस्से आणि खंड (क्षेत्रफळ ९०.३० चौ.मी)

दिनांक: ०६.०८.२०२६ प्राधिकृत अधिकारी, रिफॉर्म एआरसी लिमिटेड
स्थळ: नाशिक (पूर्वी रीलायन्स ॲसेट रीकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड म्हणून ज्ञान)

केंद्र सरकार यांच्यासमोर
कंपनी रजिस्ट्रार, मुंबई १

मर्यादित दायित्व भागीदारी अधिनियम, २००८च्या कलम १३च्या उप-कलम (३) आणि मर्यादित दायित्व भागीदारी नियम, २००९च्या नियम १७ च्या बाबतीत;
आणि

प्रवेश निर्माण एलएलपी (एलएलपीआयएन-एएएफ-९१४७), (मर्यादित दायित्वासह नोंदणीकृत), ज्यांचे नोंदणीकृत कार्यालय सिद्ध सी ब्रूक, शिव शंकर नगर, कांदिवली, सीटीएस क्र. ८१९, शंकर पाडा, धनुकर वाडी, १, इंक रोड, मुंबई शहर, मुंबई - ४०००६७, महाराष्ट्र, भारत येथे आहे (एलएलपी), यांच्या प्रकरणात.

..... याचिकाकर्ता

सूचना याद्वारे सर्वसामान्य जनतेला देण्यात येत आहे की, **एलएलपी** आपले नोंदणीकृत कार्यालय **"महाराष्ट्र"** राज्यातून **"पश्चिम बंगाल"** या राज्यात बदलण्यासाठी, मर्यादित दायित्व भागीदारी कायदा, २००८च्या कलम १३ (३) अन्वये **कंपनी रजिस्ट्रार, मुंबई १** यांच्याकडे अर्ज करणार आहे.

एलएलपीच्या नोंदणीकृत कार्यालयाच्या प्रस्तावित बदलामुळे ज्या कोणत्याही व्यक्तीच्या हितावर परिणाम होण्याची शक्यता आहे, ती व्यक्ती आपल्या हिताचे स्वरूप आणि विरोधाची कारणे नमूद करणाऱ्या प्रतिज्ञापत्रासह, आपले आक्षेप, सदर या सूचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून २१ (एकवीस) दिवसांच्या आत, **कंपनी रजिस्ट्रार, मुंबई १,** यांच्याकडे प्रत्यक्ष सादर करू शकते, करवून घेऊ शकते किंवा नोंदणीकृत टपालाने पाठवू शकते. तसेच, याची एक प्रत याचिकाकर्ता एलएलपीला, वर नमूद केलेल्या पत्त्यावरील त्यांच्या नोंदणीकृत कार्यालयात पाठवावी.

प्रवेश निर्माण एलएलपी
यांच्या वतीने आणि त्यांच्याकरिता
सही/-
संजय जैन
(डीआयएन-०००३८८७५)
नियुक्त भागीदार
दिनांक : १०.०८.२०२६ **पत्ता:** २/४ए, सरत बोस रोड, एल.आर. सरानी,
ठिकाण : मुंबई. कोलकाता-७०० ०२०.

उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक
नोंदणीकृत कार्यालय : ग्रेप गार्डन, नं. २७, तिसरा "ए" क्रॉस, १८वा मेन, ६वा ब्लॉक, कोरामंगला, बेंगालुरू - ५६० ०९५, कर्नाटक.
प्रादेशिक कार्यालय : ७वा मजला, अल्मोंटे आयटी पार्क, सर्व्हे नं. ८, खराडी - मुंढवा बायपास, व्हिलेज खराडी, पुणे-४११०१४

ताबा सूचना

ज्याअर्थी, "उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक" चे प्राधिकृत अधिकारी असलेल्या निम्नस्वाक्षरीकारांनी सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या रुल ३ यासह वाचलेल्या सेक्शन १३(१२) अंतर्गत त्यांना प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत प्रदान आणि/ किंवा वसुलीच्या तारखेपर्यंत निघालेले आनुषंगिक खर्च, किंमत, आकार, इ. व लागू असल्यानुसार पुढील व्याजासह, उक्त सूचनेच्या स्वीकृतीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत उक्त सूचनांमध्ये नमूद केल्यानुसार लागू दरातील त्यावरील व्याजासह एकत्रित संबंधित नावांच्या अनुसार नमूद केलेल्या रकमेची परतफेड करण्यासाठी ऋणकोंवर फर्माविणाऱ्या ऋणको/सह-ऋणकोंकरिता मागणी सूचना निर्गमित केल्या आहेत.

अ. क्र.	लोन नं.	ऋणको/सह-ऋणको/हमीदार/ गहाणकाराचे नाव	१३(२) सूचना तारीख / थकित देणी (रु.त)	तारीख व ताब्याचा प्रकार
1	442321 008000 0021	**१) सुनिता डोंगरे, २) सुरेश दगडूजी डोंगरे, ३) अनूज सुरेश डोंगरे,** पत्ता - एन-३१/एफ-२, शॉप नं. ३०, सद्भावना चौक, जनता बाजार जवळ, सिडको, नाशिक - ४२२००९, महाराष्ट्र. **येथे सुद्धा** - मेसर्स साई श्रद्धा किराणा अँड जनरल स्टोअर, एन-३१/एफ-२, शॉप नं. ३०, सद्भावना चौक, जनता बाजार जवळ, सिडको, नाशिक - ४२२००९, महाराष्ट्र.	17.04.2026 / Rs. 1,62,545.02 as on 16.04.2026	०५.०८.२०२६ / सांकेतिक ताबा
		स्थावर मालमत्तेचे वर्णन : पुढील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे - मालमत्ता नाशिक म्युनिसिपल कॉर्पोरेशनच्या मर्यादेत, ता. व जि. नाशिक, धारण केलेला टेनेमेंट नं. (शॉप नं.), ३० असलेला बिल्ट-अप एरिआ १७.३९ चौ.मी., सेक्टर एफ-२ पैकी, एनएच-फाल्गून मधील, तिसरी योजना, सिडको, जी सामायिक सुखसोई / सुविधा यासह एकत्रित उक्त टेनेमेंटच्या मान्यताप्राप्त बिल्डिंग प्लाननुसार पुढीलप्रमाणे सिमित आहे : पूर्व : शॉप नं. २९, पश्चिम : मार्जिनल स्पेस, उत्तर : मार्जिनल स्पेस, दक्षिण : शॉप नं. ३१. सुनिता सुरेश डोंगरे यांच्या मालकीची मालमत्ता.		
2	44742 50260 000056	**१) नरेंद्र मानसिंह पाटील २) नीता नरेंद्र पाटील,** पत्ता - कढोली, विठ्ठल मंदिराजवळ, पाटील वाडा, ता. एरंडोल, जि. जळगाव, जळगाव, महाराष्ट्र - ४२५१०३. **येथे सुद्धा** - ॲट पिंप्राला, जळगाव, महाराष्ट्र - ४२४००१. **२) येथे सुद्धा** - जैन टिश्यू पार्क प्लान्ट, नर्सरी रोड, बंभोरी प्र., चांदसर ताकरखेडा, जळगाव, महाराष्ट्र - ४२५००२.	06.05.2026 / Rs. 4,18,092.78 as on 04.05.2026	०५.०८.२०२६ / सांकेतिक ताबा
		स्थावर मालमत्तेचे वर्णन : पुढील जमीन मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे - मालमत्ता धारण केलेला १. सीटीएस नं. १९४ असलेला जीपीएच नं. ४६३ (त्यावरील बांधकामासह) एकूण मोजमापाचा एरिआ ३३.०० चौ.मी., २. सीटीएस नं. १९५ असलेला जीपीएच नं. ४६३/१ एकूण मोजमापाचा एरिआ २१.०० चौ.मी., ३. सीटीएस नं. १९६ असलेला जीपीएच नं. ४६३/२ एकूण मोजमापाचा एरिआ २३.०६ चौ.मी., येथे स्थित - कढोली, ता. एरंडोल व जि. जळगाव. उक्त मालमत्ता पुढीलप्रमाणे सिमित आहे : पूर्व : सुभाष निंबा / नाना कृष्णा पाटील यांची मालमत्ता, पश्चिम : एकनाथ दिगंबर / वर्सत पुंडलिक पाटील यांची मालमत्ता, उत्तर : रोड व वापर, दक्षिण : रोड व वापर. नरेंद्र मानसिंह पाटील यांच्या मालकीची मालमत्ता.		

ज्याअर्थी, यावर नमूद केलेले ऋणको / सह-ऋणको / हमीदार / गहाणकार देय रकमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरले आहेत, सूचना याद्वारा विशेषकरून यावर नमूद केलेले ऋणको तसेच आम जनतेस देण्यात आली आहे की, "उज्जीवन स्मॉल फायनान्स बँके"च्या प्राधिकृत अधिकारींनी वर नमूद केलेल्या तारखां दिवशी उक्त रुल्सच्या रुल ८ यासह वाचलेल्या उक्त ॲक्टच्या सेक्शन १३(४) अंतर्गत त्याला प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत यावर वर्णिलेल्या मालमत्ता / सुरक्षित मत्तेचा ताबा घेतला आहे. सुरक्षित मत्तेच्या उपलब्ध वेळेत विमोचनाकरिता ॲक्टच्या सेक्शन १३च्या सब-सेक्शन (८)च्या तरतुदींकडे ऋणको व सह-ऋणको / गहाणकाराचे लक्ष वेधीत आहोत. विशेषकरून यावर नमूद केलेले ऋणको / सह-ऋणको / हमीदार / गहाणकार आणि आम जनतेस याद्वारा सावध करण्यात येते की, पूर्वोक्त मालमत्ता / सुरक्षित मत्तेसमवेत व्यवहार करू नये आणि पूर्वोक्त मालमत्ता / सुरक्षित मत्तेसमवेत केलेले कोणताही व्यवहार "उज्जीवन स्मॉल फायनान्स बँके"च्या आकाराच्या विषयाधीन असणार आहे.

स्थळ : नाशिक, जळगाव स्वाक्षरी/- प्राधिकृत अधिकारी,
दिनांक : ०५.०८.२०२६ उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक

MAS FINANCIAL

एमएएस फायनॅन्शियल सर्व्हिसेस लिमिटेड
६, तळ मजला, नारायण चेंबर्स, पतंग हॉटेलच्या मागे, आश्रम रोड, अहमदाबाद-३८०००९. संपर्क : ०७९-४११०६५००/७३३

ताबा सूचना
(स्थावर मालमत्तेसाठी) सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियमावली २००२च्या नियम ८ (१) अंतर्गत

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार हे **एमएएस फायनॅन्शियल सर्व्हिसेस लिमिटेडचे** सिक्युरिटायझेशन अँड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल ॲसेटस अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (५४/२००२) अंतर्गत प्राधिकृत अधिकारी आहेत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियमावली २००२ नियम ३ सह वाचल्या जाणाऱ्या कलम १३(१२) अंतर्गत दिलेल्या अधिकारांचा वापर करून, खाली नमूद केल्याप्रमाणे कर्जदार/ सह-कर्जदार/ हमीदार ह्यांना नमूद सूचना प्राप्त झाल्यापासून ६० दिवसांच्या आत सूचनेमध्ये नमूद केलेल्या रकमेचा भरणा करण्यासाठी मागणी सूचना दिनांकित **२६.०३.२०२६** जारी करण्यात आली होती.

कर्जदार रकमेचा भरणा करू न शकल्यामुळे कर्जदार/सह-कर्जदार/हमीदार आणि सामान्य जनतेला ह्याद्वारे सूचना देण्यात येत आहे की सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियमावली २००२ नियम ८ सह वाचल्या जाणाऱ्या नमूद कायद्याच्या कलम १३ च्या पोट कलम (४) अंतर्गत त्यांना देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून खाली नमूद करण्यात आलेल्या मालमत्तेचा **सांकेतिक ताबा ०३.०८.२०२६** रोजी घेण्यात आला आहे.

कर्जदार/सह-कर्जदार/हमीदार आणि सामान्य जनतेला ह्याद्वारे सावध करण्यात येत आहे की मालमत्तेशी कोणताही व्यवहार करू नये आणि मालमत्तेशी असा व्यवहार **एमएएस फायनॅन्शियल सर्व्हिसेस लिमिटेडकडे १२.०३.२०२६** अनुसार भरणा करण्यासाठी बाध्य असतील.

सुरक्षित मत्ता सोडविण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या संदर्भात कायद्याच्या कलम १३ च्या पोट कलम (८) मधील तरतुदीकडे कर्जदार/सह-कर्जदार/हमीदार ह्यांचे लक्ष वेधून घेण्यात येत आहे.

कर्जदार/ सह कर्जदार/हमीदाराचे नाव	गहाण मालमत्तेचा तपशील	कर्ज खाते क्र. ताबा दिनांक	मागणी सूचनेचा दिनांक आणि रक्कम
१. **मे. केवत कृषी सेवा केंद्र (प्रोप्रायटर श्री. पवन भगवान बिलघे ह्यांच्या द्वारे) (अर्जदार)** २. **श्री. पवन भगवान बिलघे (सह-अर्जदार आणि गहाणदार),** ३. **दिपाली पवन बिलघे (सह-अर्जदार आणि गहाणदार).**	गहाणदार/ठेवणाऱ्याचे नाव : पवन भगवान बिलघे आणि दिपाली पवन बिलघे. गहाण मालमत्तेचे वर्णन: जावखेडा ठोमब्री, ता. : भोकरधन आणि जिल्हा जालना येथे वसलेल्या १७००.०० चौ. मीटर्स पैकी २०००.०० चौ. मी. एकूण क्षेत्रफळ असलेल्या गट क्र. ६६ मध्ये असलेल्या मालमत्तेचा सर्व खंड आणि भूखंड. सीमा पुढील प्रमाणे : (विक्री करार क्र. ३२४/ २०२१ अनुसार) पूर्व : जालना भोकरधन सरकारी रोड, पश्चिम: शिव, उत्तर: कमळाबाई पुंजाराम ठोंबरे ह्यांची मालमत्ता, दक्षिण: संजय रामकिसन ठोंबरे ह्यांची मालमत्ता. सीमा पुढील प्रमाणे : (प्रत्यक्ष ठिकाणानु